# जिल्हाधिकारी कार्यालय सांगली (लेखा शाखा)

दुरध्वनी क्र. ०२३३ - २३३१८५ email-id- sanglirdc@gmail.com

---

क्र.लेखा ६ /कावि - २८८ /२०२०
दिनांक - २८ /०४/२०२०

प्रति,

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली
2. मा. आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका

विषय - कोवीड १९ या विषाणूची साथ निवारणासाठी अनुदान वाटप करणेबाबत

संदर्भ- १. इकडील आदेश क्र. गृह-१/कार्या-६/नै.आ./आरआर-१४०९/२०२०, दि.२२/०४/२०२०
२. इकडील आदेश क्र. गृह-१/कार्या-६/नै.आ./आरआर-१४१०/२०२०, दि.२३/०४/२०२०
३. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सीएलएस-२०२०/प्र.क्र. १२३/म-३, दिनांक १६/०३/२०२०

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून कोवीड १९ या विषाणूची साथ निवारण करणेसाठी संदर्भ क्र. १ व २ अन्वये अनुदान मंजूर करणेत आल आहे. त्या अनुषंगाने कोवीड १९ या विषाणूची साथ निवारण करणेसाठी अत्यावश्यक औषधे, उपकरणे व साहित्य खरेदी करणेसाठी खालीलप्रमाणे धनादेश पाठविणेत आले आहेत.

| अ.क. | कार्यालयाचे नांव | धनादेश कोणाचे नांवे काढावयाचा त्यांचे नांव | धनादेश कमांक व दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली | District Intigreted Health & Family Welfare, Socity, Sangli | ३३६२८७ दिनांक २५/०४/२०२० | ३७,५९,३५०/- |
| २ | आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका | General Fund Sangli Miraj Kupwad Fund Corporation | ३३६२८८ दिनांक २८/०४/२०२० | ५१,६७,८११/- |

श्री. रामलिंग चव्हाण
तहसिलदार सर्वसाधारण

जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचे कार्यालय (नैसर्गिक आपत्ती शाखा),पत्ता-विजयनगर,सांगली

फोन नं. 0233/2600363 ई-मेल sanglirdc@gmail.com

वाचले:- 1) महसुल व वन विभाग,यांचेकडील शासन निर्णय क्र.सीएसलएस 2020/प्र.क्र.123/म-3 दि.16/03/2020
2) विभागीय आयुक्त पुणे विभाग,पुणे यांचेकडील आदेश क्र.ससंता/नैआ कोरोना/2245 0244/2020-21/289/2020 दिनांक 04/04/2020

क्र.गृह-1/कार्या-6/नै.आ/आरआर/ 1810 /2020 दि. 23/04/2020

आदेश

**ज्याअर्थी** देशात व राज्यामध्ये COVID -19 विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यामुळे रोगराई नियंत्रीत करण्याची आवश्यकता विचारात घेवून उपाययोजना करण्यासाठी उपरोक्त संदर्भीय वाचले क्र २ अन्वये सांगली जिल्हयासाठी एकूण र १,००,००,०००/-(र रु एक कोटी फक्त ) इतका निधी मंजूर झालेला आहे.

**त्याअर्थी आयुक्त** सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, यांनी त्यांचे दि ०९/०४/२०२० रोजीचे मागणी केले प्रस्तावानुसार मी. डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी, सांगली मला प्राप्त झाले अधिकारानुसार व राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार र रु **५१,६७,८११/-** (र. रु. एक्कावन्न लाख सदुसष्ट हजार आठशे अकरा मात्र) कोव्हीड-१९ साथ नियंत्रणासाठी खरेदी करण्यात आलेली अत्यावश्यक औषधे व साहित्य यासाठी **आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,** यांना धनादेशव्दारे अनुदान वितरीत करणेस मंजूरी देत आहे.

मंजूर करणेत आलेल्या निधीचा तपशील खालीलप्रमाणे

| अ क्र | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | औषधे व साहित्य | ४१,२६,६९९ |
| २ | आयसोलोशन/क्वारंटाईन वार्ड साठी खर्च | १०,४१,११२ |
| | **एकूण** | **५१,६७,८११** |

सदर निधी खालील अटी व शर्ती नुसार खर्च करणेत यावा.

१. उपरोक्त निधी खर्च करताना महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र महसुल व वन विभाग,यांचेकडील शासन निर्णय क्र.सीएसलएस 2020/प्र.क्र.123/म-3 दि.16/03/2020 आणि केंद्रशासन गृहमंत्रालय यांचे पत्र क्र 33 -4/2020- एनडीएम-१ दि 14/03/2020 यामधील तरतूदीनुसार सर्व अटी व शर्तीची पूर्तता पूर्ण करुन खर्च करण्यात यावा.
२. वितरित केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि शासनाच्या विविध नियमातंर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे. तसेच सदर निधी खर्च करताना, आयुक्त महानगरपालिका हे लेखा आक्षेप, लोक लेखा समिति, विधीमंडळ कामकाज इ. बाबीसाठी संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागास जबाबदार राहतील.
३. वितरीत करणेत आलेल्या निधीस प्रशासकीय मंजूरी देणेची व खर्च करणेसाठी विहीत कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेची सर्वस्वी जबाबदारी आयुक्त महानगरपालिका यांची राहील.
४. प्रस्तावित औषधे खरेदीस तांत्रिक मंजुरी देण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याने दराबाबत ते वस्तुनिष्ठ आहेत याची खात्री करुन घ्यावी.
५. मंजूर करणेत आलेल्या निधीच्या मर्यादेतच निधी खर्च करणेची दक्षता घ्यावी.
६. वितरीत केलेला निधी खर्च झालेनंतर विहीत नमुनेमधील उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणेत यावे. उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेशिवाय पुढील निधी वितरीत करणेत येणार नाही.

जिल्हाधिकारी सांगली SANGLI

(डॉ. अभिजीत चौधरी)
**जिल्हाधिकारी सांगली**

प्रति

आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांना पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी